
ePaper

# अखेर त्या नरभक्षक बिबट्याला ठार मारण्यात मोठे यश!

| वर्ष - 9 | अंक -83 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- रसेल-मिलर-आकाशदीप संघाबाहेर
- भारताचा नवा 'सिक्सर किंग', ऋषभ पंत
- जगाला राजकारण शिकवण्याची ताकद
- लालू यादव यांच्या घरतील 'जयचंद'


www.mahaenews.com | रविवार, दि. 16 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## हवामान खात्याचा हाय अलर्ट — दक्षिण भारतासाठी IMD कडून रेड अलर्ट

# पुन्हा अतिमुसळधार पावसाचे संकट!

## महाराष्ट्राला दिलासा, पण थंडीचा कडाका वाढणार

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**देशात आधीच सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडून शेती, शहरं आणि ग्रामीण भाग त्रस्त असताना पुन्हा एकदा भारतीय हवामान विभागाने (IMD) मोठा इशारा जारी केला आहे. दक्षिण श्रीलंका परिसरात आणि बंगालच्या उपसागरात सायक्लोनिक सर्क्युलेशन तयार झाले असून, त्याच्या परिणामामुळे देशाच्या अनेक भागांमध्ये पुन्हा अतिमुसळधार पाऊस धडक देणार आहे. दक्षिण भारतात पुन्हा अतिमुसळधार पाऊस, सायक्लोनिक सर्क्युलेशन आणि वादळाची शक्यता यामुळे परिस्थिती गंभीर आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात पाऊस नसल्याने शेतकऱ्यांना आणि नागरिकांना दिलासा मिळाला आहे, पण थंडीची लाट राज्यात धडकणार आहे.**



- पुनश्च अतिमुसळधार पावसाचं संकट
- तामिळनाडू–केरळमध्ये रेड/ऑरेंज अलर्ट
- आंध्रमध्ये विजांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस
- हवामान खाते: वाऱ्याचा वेग 50 किमी प्रतितास
- महाराष्ट्राला दिलासा – पावसाचा इशारा नाही
- मात्र राज्यात थंडीचा कडाका वाढणार
- मराठवाड्यात थंडीची तीव्र लाट
- शेतकऱ्यांना थंडीपासून पिके संरक्षित ठेवण्याची सूचना
- बंगालच्या खाडीत आणि श्रीलंका परिसरात सायक्लोनिक सर्क्युलेशन सक्रिय

### दक्षिण भारतात मुसळधार पावसाचा मारा

पुढील काही दिवस हवामानातील हे बदल देशभरात परिणाम घडवू शकतात. हवामान विभाग आणि प्रशासन नागरिकांनी सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

काही दिवस वातावरण शांत असल्याने पावसाचं संकट टळलं असं वाटत असतानाच पुन्हा पावसाचा इशारा आल्यानं नागरिक आणि प्रशासनाची चिंता वाढली आहे.

### देशभरात पावसाला पोषक वातावरण हवामान विभागाची मोठी घोषणा

IMD च्या माहितीनुसार देशात पुनश्च पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे.

दक्षिण श्रीलंका आणि पश्चिम बंगालच्या खाडीमध्ये सायक्लोनिक सर्कुलेशन सक्रिय झाले असून त्यातून कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. हा पट्टा पश्चिम-उत्तरेकडे सरकत असल्याने तामिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश, लक्षद्वीप आणि अंदमान-निकोबार बेटांवर पावसाचा जोर वाढणार आहे.

या परिस्थितीमुळे अनेक राज्यांत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

IMD चा ताज्या पावसाचा अंदाज (15–19 नोव्हेंबर)

तामिळनाडू – 16 आणि 17 नोव्हेंबरला अतिमुसळधार पाऊस

### काही ठिकाणी रेड अलर्ट

विजांचा कडकडाट, सोबत दमदार वारे

वाऱ्याचा वेग ताशी 50 किमीपर्यंत

**केरळ** – हलका ते मध्यम आणि काही भागांत मुसळधार पाऊस

किनारी भागांमध्ये वाऱ्याचा जोर वाढणार

पूरस्थिती उद्भवू शकते, खबरदारीचा इशारा

### आंध्र प्रदेश – जोरदार ते अतिजोरदार पाऊस;काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

वादळासह मुसळधार पावसाचे संकेत

लक्षद्वीप आणि अंदमान-निकोबार बेटं

2–3 दिवस मुसळधार पावसाचा मारा

मच्छीमारांना खोल समुद्रात न जाण्याचा सल्ला

महाराष्ट्राबाबत सर्वात मोठी अपडेट दक्षिण भारतात अलर्ट जारी असतानाच महाराष्ट्राला मात्र मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यात कोणत्याही प्रकारचा नवीन पावसाचा इशारा नाही. मात्र हवामान विभागाने दुसरा महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे—

### महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढणार!

पुढील काही दिवस तापमानात झपाट्याने घसरण

मराठवाड्यात कडक थंडीची लाट

विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात तापमान 10 खाली जाण्याची शक्यता

रात्री थंडी तीव्र, दिवसाची तापमानात घट

### शेतकऱ्यांसाठी काय अर्थ?

या वर्षी सरासरीपेक्षा थिक पाऊस पडल्याने:

खरीप हंगामाचे मोठे नुकसान

नद्या आणि नाल्यांना आलेल्या पुरामुळे गावोगाव नुकसान

### अनेकांचे संसार उद्ध्वस्त

यामुळे शेतकरी कोलमडून गेला होता. मात्र आता महाराष्ट्रात पावसाचा धोका नाही, हे शेतकऱ्यांसाठी मोठं समाधानकारक आहे.

**तरीही थंडीची लाट वाढत असल्याने:**

भाजीपाला पिकांसाठी काळजीउशिरा पेरणी केलेल्या पिकांवर दुष्परिणाम

बागायती पिकांना थंडीपासून संरक्षणाची आवश्यकता

हवामान खात्याने शेतकऱ्यांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

**या वर्षी महाराष्ट्रात:** अतिवृष्टीमुळे हजारो हेक्टर शेतीचे नुकसान

कोल्हापूर, सांगली, नाशिक, जळगाव, नागपूर येथे पूरस्थिती

ग्रामीण भागात शेकडो घरे व वाहने पाण्यात वाहून गेली

रस्ते, पूल, सिंचन संरचनांचे प्रचंड नुकसान

म्हणूनच पुन्हा पावसाचा इशारा येताच लोकांची चिंता वाढली. पण यावेळी महाराष्ट्र सुरक्षित असून पाऊस दक्षिण भारतातच मर्यादित राहणार असल्याचे IMD म्हणते.

### देशभरातील नागरिकांसाठी IMD चे मार्गदर्शन

अतिमुसळधार पाऊस आणि वादळ असलेल्या भागांसाठी घराबाहेर अनावश्यक फिरणे टाळा

निचांकी भागांपासून दूर रहा विद्युत तारांपासून लांब

मच्छीमारांनी समुद्रात न जाता किनाऱ्यावर राहावे

## अजित दादांचा गौप्यस्फोट

## पक्षातील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर

# बिहारच्या निवडणुका लढवू नका!

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या सर्व उमेदवारांची अनामत जप्त होण्याची नामुष्की अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर ओढावली आहे. या निवडणुका लढवू नका, असे मी सांगितले होते, असा गौप्यस्फोट अजित पवार यांनी केला आहे. पवार यांच्या रोखठोक खुलाशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील अनागोंदी उघड झाली आहे.**

## राष्ट्रवादीधील अनागोंदी उघड



शिल्पकार राम सुतार यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री शुक्रवारी नोएडा येथे गेले होते. त्यावेळी माध्यमांशी अजित पवार यांनी संवाद साधला. 'बिहारच्या निवडणुकांची पक्षाची तयारी नव्हती. मला त्या निवडणुकांकडे लक्ष देण्यास वेळ नव्हता. या निवडणुका लढवू नये, असे मी स्पष्टपणे सांगितले होते. बिहारच्या निवडणुकांची जबाबदारी कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्यावर देण्यात आली होती, असे पवार यांनी सांगितले.राष्ट्रवादीने बिहारमध्ये १६ उमेदवार उभे केले होते. त्यामध्ये महुआ, पिंप्रा आणि मनिहारी या तीन मतदारसंघातील उमेदवारांनी किमान हजार मताचा टप्पा ओलांडला. बाकी १३ उमेदवार २०० ते ९०० मतांच्या दरम्यान आहेत. राष्ट्रवादीला बिहारमध्ये अवघी ०.०३ टक्के मते मिळाली. विशेष म्हणजे'नोटा'ला (कुणीही पसंत नाही) राष्ट्रवादीपेक्षा अधिक मते (१.८२ टक्के) आहेत. राष्ट्रवादीचा एकही उमेदवार किमान १/६ मते प्राप्त करु न शकल्याने सर्वांच्या अनामत रकमा जप्त झाल्या आहेत.राष्ट्रवादी महाराष्ट्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीत आहे. बिहारमध्ये मात्र या पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवली. पक्षाचा राष्ट्रीय पक्ष म्हणून गेलेला दर्जा प्राप्त करण्याचा यामागे प्रयत्न होता. मात्र या निवडणुकांसाठी पक्षाने महाराष्ट्रातून काही रसद पुरवली नाही. स्टार प्रचारक नेमले पण, राज्यातूनही एकही नेता प्रचाराला गेला नाही. एकसंध राष्ट्रवादी असताना पक्षाचा बिहारमध्ये आमदार आणि खासदारही होता. बिहारचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभारी ब्रिजकुमार श्रीवास्तव यांनी पक्षाने उमेदवारांना कोणतीही मदत केली नाही, अशी खंत व्यक्त केली आहे. नौटन : जयप्रकाश २७०, मनिहारी : सैफअली खान ४८६५, पारस : बिपीन सिंह ७८६, महुआ : अखिलेश ठाकुर १०००, राघोपुरा : अनिल सिंह ९८३, सासाराम : आशुतोष सिंह ५६३, पिंप्रा : अमीत कुशवाह २०१४, सोनेपूर : धर्मवीर कुमार ४७१, बाखरी : विकास कुमार ६०९, अमरपूर : अनिल कुमार सिंह ३९५, पटनासाहीब : आदिल अफताब खान ९०२, मोहनिया : मन्नु कुमार ३१८, दिनारा : मनोजकुमार ७८१, नरकटियाजंग : मोहम्मद अझीम २९१अशी मते राष्ट्रवादी उमेदवारांना मिळाली आहेत. बिहार विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या सर्व उमेदवारांची अनामत जप्त होण्याची नामुष्की अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर ओढावली आहे.

या निवडणुका लढवू नका, असे मी सांगितले होते, असा गौप्यस्फोट अजित पवार यांनी केला आहे. पवार यांच्या रोखठोक खुलाशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील अनागोंदी उघड झाली आहे. शिल्पकार राम सुतार यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री शुक्रवारी नोएडा येथे गेले होते. त्यावेळी माध्यमांशी अजित पवार यांनी संवाद साधला. 'बिहारच्या निवडणुकांची पक्षाची तयारी नव्हती. मला त्या निवडणुकांकडे लक्ष देण्यास वेळ नव्हता. या निवडणुका लढवू नये, असे मी स्पष्टपणे सांगितले होते. बिहारच्या निवडणुकांची जबाबदारी कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्यावर देण्यात आली होती, असे पवार यांनी सांगितले.राष्ट्रवादीने बिहारमध्ये १६ उमेदवार उभे केले होते. त्यामध्ये महुआ, पिंप्रा आणि मनिहारी या तीन मतदारसंघातील उमेदवारांनी किमान हजार मताचा टप्पा ओलांडला. बाकी १३ उमेदवार २०० ते ९०० मतांच्या दरम्यान आहेत.

### अनामत रकमा जप्त झाल्या

राष्ट्रवादीला बिहारमध्ये अवघी ०.०३ टक्के मते मिळाली. विशेष म्हणजे'नोटा'ला (कुणीही पसंत नाही) राष्ट्रवादीपेक्षा अधिक मते (१.८२ टक्के) आहेत. राष्ट्रवादीचा एकही उमेदवार किमान १/६ मते प्राप्त करु न शकल्याने सर्वांच्या अनामत रकमा जप्त झाल्या आहेत. राष्ट्रवादी महाराष्ट्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीत आहे. बिहारमध्ये मात्र या पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवली. पक्षाचा राष्ट्रीय पक्ष म्हणून गेलेला दर्जा प्राप्त करण्याचा यामागे प्रयत्न होता.

# योजनांबाबत आयोगाने विचार करावा!

## शरद पवार यांची सूचना; बिहारच्या निकालावर परिणाम...

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात निवडणुकीच्या आधी राज्य सरकारने 'लाडकी बहीण योजने'द्वारे पैसे वाटप केले. त्याचप्रमाणे बिहारमध्ये महिलांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपये जमा करण्यात आल्याचा परिणाम बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालावर झाल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. मतदानाच्या आधी अशा पद्धतीने पैशाचे वाटप केल्यास निवडणूक पद्धतीबद्दल मतदारांच्या विश्वासाला धक्का बसेल.**



हे योग्य आहे का, याचा विचार आता निवडणूक आयोगाने करावा, अशी सूचनाही पवार यांनी केली.

बारामती येथे पत्रकारांशी संवाद साधताना पवार म्हणाले, 'यापुढील काळात सत्ता हातात असलेल्यांनी मतदानाच्या आधी पैशाचे वाटप करून निवडणुकीला सामोरे जाण्याची भूमिका घेतल्यास लोकांच्या विश्वासाला धक्का बसेल. याची चिंता वाटत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पैशांचे वाटप करणे योग्य आहे का, याचा विचार जाणकारांनी आणि निवडणूक आयोगाने केला पाहिजे.'निवडणुका या स्वच्छ, पारदर्शक पद्धतीने झाल्या पाहिजेत याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. महाराष्ट्रात निवडणुकीच्या आधी सरकारने 'लाडकी बहीण योजने'द्वारे पैसे वाटप केले. त्याचप्रमाणे बिहारमध्ये महिलांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपये जमा करण्यात आल्याचा परिणाम बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालावर झाला,' असे पवार यांनी स्पष्ट केले.सर्व राज्यांमध्ये सुमारे ५० टक्के महिला मतदार आहेत. त्यांना दहा हजार रुपये देऊन निवडणुकीला सामोरे जाणे याचा अर्थ निवडणुका पारदर्शक आणि स्वच्छ वातावरणात होतात का, याबाबत लोकांच्या मनात शंका आहे.

### 'आयोगाची बघ्याची भूमिका'

निवडणूक आयोगाने याचा विचार केला पाहिजे,' असेही पवार म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आयोगाचे आभार मानले. याबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले, 'पैसे वाटप होत असताना आयोगाने बघ्याची भूमिका घेतली. त्यामुळे हे होणारच.''स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पक्ष म्हणून लढविण्यात येत नाही. स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा अधिकार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. त्यांनी योग्य तो निर्णय घ्यावा, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक | एकनाथ शिंदेंची शिवसेना

# पिंपरीत स्वबळावर लढण्यास तयार!

## खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती; युतीबाबत वरिष्ठ पातळीवर जो निर्णय होईल, त्याची अंमलबजावणी केली जाईल

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत ३२ प्रभागातील १२८ जागांवर स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी असल्याचे शिवसेनेचे (शिंदे) खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. युतीबाबत वरिष्ठ पातळीवर जो निर्णय होईल, त्याची अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले..**

शनिवारी पिंपरी येथे झालेल्या शिवसेनेच्या पदाधिकारी प्रशिक्षण मेळाव्यात खासदार बारणे बोलत होते. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या या मेळाव्यास उपनेत्या सुलभा उबाळे, इरफान सय्यद, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, महानगर प्रमुख राजेश वाबळे, शहरप्रमुख निलेश तरस, महिला आघाडीच्या सरिता साने यांसह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

### "भाजपसोबत नैसर्गिक युती, अंतिम निर्णय वरिष्ठांचा" — बारणे

निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच युतीच्या चर्चांना वेग आला असताना खासदार बारणे यांनी महत्त्वाची भूमिका व्यक्त केली. त्यांनी स्पष्ट केले, "भाजप आणि शिवसेनेची नैसर्गिक युती आहे. युतीस प्राधान्य आहे. मात्र, अंतिम निर्णय हा वरिष्ठ पातळीवरच होणार असून, ते जे सांगतील त्यानुसार शिवसेना काम करेल."

तथापि, तरतरीत आत्मविश्वासाने त्यांनी सांगितले की, युती व्हो किंवा न व्हो, शिवसेना १२८ही जागांवर लढण्यासाठी पूर्ण सिद्ध आहे. निवडणूक तयारी, बुथरचना, मतदारयादी तपासणी, स्थानिक प्रभागांचा अभ्यास या सर्व गोष्टींचे नियोजन पक्षाकडून सुरू झाल्याचे त्यांनी नमूद केले.

### शिवसैनिकांना "गाफील राहू नका"चा इशारा

आपल्या भाषणात खासदार बारणे यांनी पदाधिकारी आणि शिवसैनिकांना खणखणीत संदेश दिला. त्यांनी म्हटले— "गाफील राहण्याचा काळ आता संपला आहे. प्रत्येकाने आपल्या प्रभागाचा बारकाईने अभ्यास करावा. मतदारयादीकडे विशेष लक्ष द्यावे, नवीन मतदारांशी संपर्क वाढवावा आणि सूक्ष्म नियोजन करून लगेचच कामाला लागावे."

पिंपरी-चिंचवड महापालिका हे विशेषतः राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे आणि अत्यंत स्पर्धात्मक रणांगण असल्याने शिवसेनेने संख्याबळ वाढविणे हेच यंदाच्या निवडणुकीचे मुख्य ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. "महापालिकेत शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारी स्वीकारून संघटनबांधणी बळकट करणे आवश्यक आहे," असे ते म्हणाले.

### शहरात अंतर्गत बळकटीकरणाची तयारी

या प्रशिक्षण मेळाव्यात विविध प्रभागांमधील संघटन रचना, महिला आणि युवा आघाडीची हालचाल, डिजिटल प्रचार, समाजभेटी आणि स्थानिक पातळीवरील नेतृत्व विकसित करण्यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शहरप्रमुखांनी सर्व पदाधिकाऱ्यांना निवडणुकीसाठी 'बुथ वॉर रूम' तसेच 'प्रभागनिहाय संपर्क अभियान' तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

### स्वबळावरची लढत अधिक रोचक ठरणार

पिंपरीत शिवसेना (शिंदे गट) स्वबळावर लढण्यास सज्ज असल्याची घोषणा होताच आगामी महापालिका निवडणुकीचे राजकारण आणखी रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत. युती व्हो वा न व्हो, पण शिवसेनेकडून १२८ही जागांवर उमेदवार उभे राहणार असल्याचे खासदार बारणे यांनी स्पष्ट केल्याने भाजप आणि इतर पक्षांच्या रणनीतीवरही त्याचा परिणाम होणार आहे. शिवसेनेचा हा आत्मविश्वास आणि बारणे यांची भूमिकेमुळे पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक अधिक चुरशीची होणार हे निश्चित. आगामी काही दिवसांत पक्षांतर्गत हालचाली आणि युतीबाबतचे निर्णय या सगळ्यांवर शहरातील राजकीय समीकरणे बदलताना दिसणार आहेत.

मेळाव्यात शिवसेनेचे वरिष्ठ नेते आणि शहरातील पदाधिकाऱ्यांनी निवडणूक तयारीचे विविध मुद्दे मांडत स्थानिक समस्या, विकास कामांची गरज आणि जनतेच्या अपेक्षांवर चर्चा केली. पिंपरी-चिंचवडमधील वाढती लोकसंख्या, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, तसेच प्रभागनिहाय मूलभूत सुविधांवर पक्ष येत्या काही दिवसांत जनतेला ठोस आश्वासने देणार असल्याची माहिती मेळाव्याच्या सूत्रांनी दिली.

# 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' यंदा मोशीत!

## मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांची माहिती; 30 हजारपेक्षा जास्त सायकलस्वार होणार सहभागी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वारकरी सांप्रदायामध्ये श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेचा संदेश देणारा भव्य 'रिव्हर सायक्लोथॉन' उपक्रम यंदा मोशी येथील स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे आयोजित केला जाणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.**




आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धन आणि नदी स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यासाठी प्रतिवर्षी 'रिव्हर सायक्लोथॉन'चे भोसरी येथील गावजत्रा मैदानावर आयोजित केले जाते. मात्र, सायकलपटू आणि पर्यावरण प्रेमींचा वाढता प्रतिसाद पाहता यंदा अधिक प्रशस्त आणि सुव्यवस्थित ठिकाण निवडण्यात आले आहे. स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे होणार आहे. पुणे–नाशिक महामार्गाजवळील हे ठिकाण मोठ्या संख्येने सहभागी होणाऱ्या सायकलस्वारांसाठी सोयीस्कर आहे. सदर सायक्लोथॉन रविवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता मोशी येथून सुरू होईल. यंदा तब्बल ३५ हजाराहून अधिक सायकलस्वार सहभागी होणार आहेत. पर्यावरण, आरोग्य आणि भावी पिढ्यांच्या संरक्षणासाठी समाजातील सर्व लोकांना एकत्र आणण्याचा उद्देश आहे. उपक्रमाचे आयोजन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने केले जात आहे. मुख्य संदेश "एक पाऊल भावी पिढीसाठी" ह्या ब्रीदवाक्याखाली पर्यावरण संरक्षण आणि आरोग्य जागृतीला प्राधान्य देणे आहे.

> "उत्साह तर नेहमीचा आहे, फक्त ठिकाण नवे! मोशीतील स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण येथे आयोजित 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' मध्ये प्रत्येक सायकलस्वाराचा उत्साह आणि ऊर्जा आम्हाला पहायला मिळणार आहे. पर्यावरणाच्या संदेशासाठी, इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेसाठी आणि भावी पिढ्यांसाठी या उपक्रमात पर्यावरण प्रेमी, अबालवृद्धांनी सहभागी व्हावे. या ठिकाणी प्रशस्त पार्किंग आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. वसुंधरा संवर्धनाचा जागर या निमित्ताने करुन विक्रमी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करीत आहोत.
> **–डॉ. निलेश लोंढे,** मुख्य समन्वयक.

# शिक्षणाची नवी दिशा




**कौशल्य विद्यापीठांची संकल्पना अलीकडच्या काळातली आहे. नुकतेच काही राज्यांनी यांची स्थापना केली आहे. आजघडीला महाराष्ट्रात तसेच हरियाणा, दिल्ली, गुजरात, राजस्थान, आसाम सारख्या राज्यात ही विद्यापीठे आहेत.**

‘कौशल्य प्रशिक्षणा’तील सुसूत्रतेसाठी यापूर्वी २००८ ला स्थापन झालेल्या राष्ट्रीय कौशल विकास महामंडळाच्या (नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन – एनएसडीसी) प्रमाणपत्र व अनेक योजनांद्वारे मनुष्यबळ विकसित केले जात होते; त्यासाठी सेक्टर स्किल कौन्सिल्सचीही स्थापना करण्यात आली, त्यात विविध प्रकारच्या उद्योग क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश होता; परंतु प्रमाणपत्र-अभ्यासक्रमच सुरू होते आणि त्यातील काही दूरशिक्षणाद्वारे सुरू होते. याच्या पुढले पाऊल म्हणजे, कौशल्यावर आधारित पदवी व पदव्युत्तर पदवीची संकल्पना! ही संकल्पना ‘कौशल्य विद्यापीठा’द्वारे राबवण्याचा उत्तम प्रयत्न केंद्र शासनाने केला आहे. अशा प्रकारच्या सर्व विद्यापीठांसाठी देशव्यापी एकरूप असा अभ्यासक्रम आराखडा (नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क) बनवला गेला असून कौशल्यावर आधारित व पारंपरिक विद्यापीठांद्वारे चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांचे ‘क्रेडिट फ्रेमवर्क’ दिलेले आहे. ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०’मध्येही कौशल्य



विकासावर भर देण्यात आलेला आहेच.‘कौशल्य विद्यापीठां’तून दिल्या जाणाऱ्या शिक्षणापैकी ४० टक्केच वर्गखोल्यांतले शिक्षण असावे आणि उर्वरित ६० टक्के वाटा हा प्रत्यक्ष कौशल्य-शिक्षणावरच आधारित असावा, अशी संकल्पना आहे. महाराष्ट्र शासनाने स्थापित केलेले कौशल्य विद्यापीठ हे राज्यव्यापी विद्यापीठ असणे अपेक्षित आहे. अन्य राज्यांतही राज्य विधेयकांतून या विद्यापीठांची स्थापना झालेली आहे. यापैकी पहिल्या- हरियाणातील ‘विश्वकर्मा कौशल्य विश्वविद्यालया’ची स्थापना सन २०१६ मध्ये झाली. त्यानंतर जवळपास सहा वर्षांनी (मागच्या वर्षी) इमारतीचे बांधकाम दुधोला पलवल येथे झाले. दि राजस्थान आयएलडी युनिव्हर्सिटी -२०१७ (दौलतपूर), मग २०२० मध्ये आसाम स्किल युनिव्हर्सिटी (प्रस्तावित आवार : मंगल्दाई, जिल्हा दारंग ) आणि दिल्ली स्किल्स युनिव्हर्सिटी, तर गुजरात स्किल युनिव्हर्सिटी (शिलाज, अहमदाबाद)ची स्थापना २०२१ मध्ये झाली आहे. ‘महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठा’ची स्थापना २०२२ ची आहे (विधेयक २०२१ मधले, प्रस्तावित ठिकाण : पनवेल-नवी मुंबई). अनेक इतर राज्यांनी कौशल्य विद्यापीठांची घोषणा केलेली आहे.दिल्ली स्किल्स युनिव्हसिटी’ने ब्राउन फील्ड पद्धतीने, दिल्लीत असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांतील डिप्लोमांचा समावेश विद्यापीठात करून घेतला. इथे तांत्रिक शिक्षणा बरोबरच इतर कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम देण्यात येत आहेत. असलेल्या मूलभूत सुविधांचा उपयोग करून या विद्यापीठांनी कार्याचा आरंभ केला आहे. राजस्थानच्या कौशल्य विद्यापीठाने महाविद्यालयांना संलग्नता दिली आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने नवी मुंबई, पुणे व नागपूर येथे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालू केले आहेत. अभ्यासक्रम तयार करणे, प्रयोगशाळा, वर्ग खोल्या, प्राध्यापक नियुक्त्या, भौतिक सोयीसुविधा, परीक्षा विभाग, परीक्षा मंडळ, फी समिती, परिनियम, अभ्यास मंडळाची तसेच विद्यापरिषदेची स्थापना यांखेरीज कौशल्य विद्यापीठाला लागणारे उद्योग जगाशी निगडित ‘ऑन द जॉब ट्रेनिंग’ सुविहीतपणे होत राहील याची व्यवस्था व त्यासाठी नियामक मंडळाची स्थापना करणे हेही आवश्यक असते. अशा अनेक बाजू विठ्यापीठाच्या स्थापने पासून करणे आवश्यक होते. ‘ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट’ असलेल्या महाराष्ट्र, आसाम, हरियाणा, गुजरात इथल्या कौशल्य विद्यापीठांचा प्रभाव किमान पाच वर्षांत -म्हणजे एक चार वर्षाची बॅच बाहेर पडल्यावर- सगळ्या पर्यंत पोहोचेल.महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात २१ अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात आली आहे. उद्योग समूहांशी ५५ करार केले असून सर्व अभ्यासक्रमांत हे उद्योग समूह विद्यार्थ्यांना ‘ऑन द जॉब ट्रेनिंग’ देणार आहेत. टाटा ट्रेंट, मॅकडोनाल्ड, मेट्रोपोलिस, केपीएमजी, पर्सिस्टन्ट सिस्टिम्स, वर्ल्ड ट्रेड सेन्टर यांसारख्या कंपन्यांचा /संस्थांचा समावेश आहे. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमात ‘डिझाइन थिंकिंग’वर भर देण्यात आला आहे.

## प्रासंगिक »

### ‘रेवडी’देवीचा विजय!

***निवडणूक आयोगाविरोधात आगपाखड करण्यापुरते एकत्र येऊन विरोधकांस चालणारे नाही. भाजपने राजकारणाचे आयाम पूर्णपणे बदलून टाकलेले आहेत...***

देशाच्या लोकसंख्येच्या साधारण १० टक्के जनता एकट्या बिहार या राज्यात निवास करते. म्हणजे १३ कोटींहून अधिक नागरिक या एका राज्यात आहेत. या नागरिकांचे सरासरी दरडोई वार्षिक उत्पन्न आहे फक्त ६६ हजार रुपये इतके. देशाच्या सरासरी दरडोई उत्पन्नाच्या एकतृतीयांशहून कमी. देशातील आणि बऱ्याचदा जगातील कोणत्याही आस्थापनांत बिहारी मजूर/ कर्मचारी नसणे फारच दुर्मीळ. इतकेच काय आपल्या सर्व राज्यांतील शेतांवर बिहारी मजूर राबताना दिसतात. या बिहारेतर राज्यांतील शेतमजुरांच्या तुलनेत बिहारमधील शेतांवर राबणाऱ्या मजुरांची कमाई खूपच कमी आहे. कारण बिहारमधील शेतीची उत्पादकता अन्य राज्यांतील शेतीपेक्षा फारच कमी आहे. तसेच खुद्द बिहार राज्यात काम करू इच्छिणाऱ्या तरुणांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे.

‘शेतकऱ्यांना सक्षम करायचे आहे की कमकुवत?’ हा रमेश पाध्ये यांचा लेख (लोकसत्ता विचारमंच- १२ जुलै) वाचला. हा लेख पटण्याजोगा नाही कारण त्यातील मांडणी वाचकांची दिशाभूल करणारी आहे. हा लेख प्रामुख्याने किमान आधारभूत किमती व त्यात झालेल्या ‘अवास्तव’ वाढीवर बेतलेला आहे.

## शेतकऱ्यांना कुबड्या नको, स्वातंत्र्य द्या!

आधारभूत किमतीच्या कुबड्या काढल्या तर शेतकरी सक्षम कसा होईल या बाबतीत मात्र ते काही बोलत नाहीत.मी शेतकरी संघटनेचा अध्यक्ष होतो, तसेच मोदी सरकारने २०२० साली पारित केलेल्या तीन कृषी कायद्यांना स्थगिती दिल्यानंतर, कायद्यामध्ये दुरुस्त्या करून शिफारशी करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या तीन सदस्यांच्या समितीत मी एक सदस्य होतो. शेतकरी संघटनेने किमान आधारभूत किमतीचे (एमएसपी) समर्थन कधीचे केलेले नाही तसेच एमएसपीचा कायदा व्हावा या मागणीला कडाडून विरोध केला आहे. इतकेच काय, शरद जोशींनी कृषी मूल्य आयोग बरखास्त करा अशी मागणी केलेली आहे.हरीतक्रांतीनंतर कृषीमूल्य आयोगाची स्थापन करण्यात आली मात्र किमान आधारभूत किंमत ठरवताना ती शेतीमालाच्या उत्पादन खर्चावर न ठरवता जागतिक बाजार, मागणी- पुरवठा स्थिती, राजकीय परिस्थिती, निवडणुका वगैरे लक्षात



घेऊन ठरवली जाते असे, असे ते म्हणतात व ते खरे आहे. याचा अर्थ ती उत्पादन खर्चावर आधारित नसे. पाध्ये यांच्या म्हणण्यानुसार १९८० मध्ये शरद जोशींनी सरकारवर दबाव टाकून आधारभूत किमती वाढवण्यास सुरुवात केली. शरद जोशींनी ‘उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव’ मागितला यात काय चूक झाली? त्याकाळी शेतकऱ्यांना येणारे अनेक खर्च हिशोबत धरले जात नसत किंवा अगदीच कमी धरले जात. शेणखताची बैलगाडी खर्चात धरताना ३/- रुपये प्रती गाडी व दूध उत्पादकांच्या उत्पन्नाच्या हिशोबत शेणखताची बैलगाडी ३०/- रुपयाला धरली जात असे. शेतकऱ्याला खते घेण्यासाठी प्रवास खर्च लागत नाही माल बाजारात न्यायला खर्च येत नाही हे कसे? त्या काळी तर फक्त तालुक्याच्या गावालाच खताची दुकाने असत व बाजार समित्या आज ही तालुक्याच्या गावीच आहेत. शेतकऱ्याच्या कुटुंबातील व्यक्ती शेतात कष्ट करतात त्याची मजुरी धरली जात नसे. वीजबिल तर आज ही धरले जात नाही हे हिशेबत धरायला नको? औद्योगिक वस्तूंची किंमत ठरवताना कारखानदार हे सगळे खर्च हिशोबात धरतोच ना? सीमांत शेतकऱ्याच्या शिवारात त्याच्या कुटुंबाला पुरेसे धान्य पिकत नाही, असे म्हटले आहे. सीमांत शेतकऱ्यांची व्याख्या म्हणजे पाच एकर ते अडीच एकर शेत जमिनीचा मालक अशी आहे. एखाद्या सीमांत शेतकऱ्याने पाच एकर गहू केला तर महाराष्ट्रात त्याला सरासरी ८० ते १०० क्विंटल गहू होतो. (पंजाबमध्ये याच्या दुप्पट होतो.) हा सीमांत शेतकरी काय १०० क्विंटल गहू घरी खाणार आहे का? त्याने कापूस, सोयाबीन, तुर, हरभरा केला तर एकरी किमान १० क्विंटल उत्पादन येते. हे सर्व तो घरी खातो का?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## पारा १५ अंशाखाली

## वाऱ्यांच्या लहरी आणि दाट धुकेही सर्वदूर पसरले

# वाढत्या थंडीने गावशिवारे काकडली!

### रब्बीच्या पेरण्यांवरही परिणाम

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**साडेपाच- सहा महिन्यांच्या प्रदीर्घ पावसानंतर कडाक्याची थंडी पडणार, हे नक्की असताना, सातारा जिल्ह्यात सलग चार- पाच दिवसांपासून थंडी वाढत चालली आहे. विशेषतः रिकाम्या शेतात, शिवारं आणि नद्यांकाठी थंडीचा चांगलाच कडाका जाणवत आहे.**



पहाटेच्या सुमारास थंडगार वाऱ्यांच्या लहरी आणि दाट धुकेही सर्वदूर पसरू लागले आहे. दिवसाही हवेत गारठा राहात असून, संध्याकाळपासून कडाक्याची थंडी सुरू होत आहे. त्यामुळे कुडकुडणाऱ्या जीवांना उबदार कपड्यांचा पेहराव करावा लागत आहे. गारवा वाढत चालल्याने पिकांवर दहिवर (दवबिंदू) पडत आहे. त्यामुळे शेतीची कामे रखडताना, लांबलेल्या रब्बीचा पेरा पिछाडीवर पडणार आहे. या थंडीचा आणि दवबिंदूंची चादर उभ्या पिकांना फटका देत आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, तापमानात घट होत असून, किमान तापमान १६ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. दिवसा गारवा असून, सकाळ- संध्याकाळ थंडीचा कडाका जाणवत आहे. त्यामुळे अबालवृद्धांनी आता कानटोपी, हातमोजे, सॉक्स, स्वेटर, शाल, जॅकेट अशी शरीराला ऊब देणारी कपडे वापरण्यास सुरुवात केली आहे. चहा, कॉफी अशा उष्ण पेयांची मागणी वाढली आहे. चहा, कॉफीची दालने लोकांनी सतत भरल्याचे दिसून येत आहे.मान्सूनपूर्व, मान्सून अन् मान्सुनेत्तर अशा साडेपाच- सहा महिन्यांच्या प्रदीर्घ पावसामुळे जसे खरिपाचे गणित बिघडवले, जवळपास तशीच स्थिती रब्बी हंगामाचीही झाली आहे. पावसाळा लांबल्याने रब्बीचा पेराही लांबला. थंडीचे आगमनही महिना- सव्वा महिन्याच्या विलंबाने झाल्याने याचा स्वाभाविकपणे रब्बीच्या पेऱ्यावरही परिणाम झाला आहे. पावसाच्या सरतेशेवटी उसतोडकऱ्यांचे प्रचंड हाल झाले. त्यांच्या पालाच्या झोपड्या पावसाच्या पाण्यात गेल्या. सध्याच्या वाढत्या थंडीमुळे या ऊस तोडणी कामगारांचे, त्यांच्या मुलाबाळांचे हाल होत आहेत. सखल भागातील ऊस क्षेत्रातील ओलावा अजूनही हटलेला नसताना, अशा ठिकाणी ऊसतोड मिळाल्याने व चारही बाजूंनी गारठून गेल्याने ऊसतोडीला वेग मिळत नसून, त्याचा साखर कारखान्यांच्या गाळपावरही विपरीत परिणाम होत असल्याचे दिसत आहे.

साडेपाच- सहा महिन्यांच्या प्रदीर्घ पावसानंतर कडाक्याची थंडी पडणार, हे नक्की असताना, सातारा जिल्ह्यात सलग चार- पाच दिवसांपासून थंडी वाढत चालली आहे. विशेषतः रिकाम्या शेतात, शिवारं आणि नद्यांकाठी थंडीचा चांगलाच कडाका जाणवत आहे. पहाटेच्या सुमारास थंडगार वाऱ्यांच्या लहरी आणि दाट धुकेही सर्वदूर पसरू लागले आहे. दिवसाही हवेत गारठा राहात असून, संध्याकाळपासून कडाक्याची थंडी सुरू होत आहे. त्यामुळे कुडकुडणाऱ्या जीवांना उबदार कपड्यांचा पेहराव करावा लागत आहे. गारवा वाढत चालल्याने पिकांवर दहिवर (दवबिंदू) पडत आहे. त्यामुळे शेतीची कामे रखडताना, लांबलेल्या रब्बीचा पेरा पिछाडीवर पडणार आहे. या थंडीचा आणि दवबिंदूंची चादर उभ्या पिकांना फटका देत आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, तापमानात घट होत असून, किमान तापमान १६ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. दिवसा गारवा असून, सकाळ- संध्याकाळ थंडीचा कडाका जाणवत आहे. त्यामुळे अबालवृद्धांनी आता कानटोपी, हातमोजे, सॉक्स, स्वेटर, शाल, जॅकेट अशी शरीराला ऊब देणारी कपडे वापरण्यास सुरुवात केली आहे. चहा, कॉफी अशा उष्ण पेयांची मागणी वाढली आहे. चहा, कॉफीची दालने लोकांनी सतत भरल्याचे दिसून येत आहे.मान्सूनपूर्व, मान्सून अन् मान्सुनेत्तर अशा साडेपाच- सहा महिन्यांच्या प्रदीर्घ पावसामुळे जसे खरिपाचे गणित बिघडवले, जवळपास तशीच स्थिती रब्बी हंगामाचीही झाली आहे. पावसाळा लांबल्याने रब्बीचा पेराही लांबला. थंडीचे आगमनही महिना- सव्वा महिन्याच्या विलंबाने झाल्याने याचा स्वाभाविकपणे रब्बीच्या पेऱ्यावरही परिणाम झाला आहे. पावसाच्या सरतेशेवटी उसतोडकऱ्यांचे प्रचंड हाल झाले. त्यांच्या पालाच्या झोपड्या पावसाच्या पाण्यात गेल्या.

### ऊस तोडकऱ्यांचे हाल

सध्याच्या वाढत्या थंडीमुळे या ऊस तोडणी कामगारांचे, त्यांच्या मुलाबाळांचे हाल होत आहेत. सखल भागातील ऊस क्षेत्रातील ओलावा अजूनही हटलेला नसताना, अशा ठिकाणी ऊसतोड मिळाल्याने व चारही बाजूंनी गारठून गेल्याने ऊसतोडीला वेग मिळत नसून, त्याचा साखर कारखान्यांच्या गाळपावरही विपरीत परिणाम होत असल्याचे दिसत आहे.

# ठाकरे गटाची निवडणुकीत आघाडी

## आता शिवशक्तीबरोबर भीमशक्ती आल्यामुळे ताकद वाढली

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी महापालिका निवडणुकीसाठी शिवसेनेचा ठाकरे गट व रिपब्लिकन पक्षाच्या गवई गटाने आघाडी करण्याचा निर्णय घेतला आहे. ठाकरे गटाचे महानगर प्रमुख किरण काळे व गवई गटाचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी ही माहिती दिली.**




नगर शहर हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. आता शिवशक्तीबरोबर भीमशक्ती आल्यामुळे ताकद वाढली आहे. या माध्यमातून मनपा निवडणूक जिंकू, असा विश्वास किरण काळे यांनी व्यक्त केला. आंबेडकरी समाज शिवसेनेसोबत खंबीरपणे उभा राहील. समाजाला शिवसेनाच न्याय देऊ शकते, असा विश्वास असल्याने एकत्र येण्याचा निर्णय घेतल्याचे सुशांत म्हस्के यांनी म्हटले आहे. निवडणुकीत अन्य कुणाशी आघाडी करायची याचा निर्णय सर्वस्वी शिवसेनेने घ्यावा. त्या निर्णयासोबत असू. आम्ही शिवसेनेचा छोटा भाऊ आहोत. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी म्हणाले, तत्कालीन पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात सगळ्यात आधी शिवशक्ती व भीमशक्तीचा प्रयोग केला. आता तो नगर शहरातही झाला आहे. आगामी काळात आम्ही ग्रामीण जिल्ह्यात हा प्रयोग करणार आहेत. मनपा, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीबाबत इच्छुक उमेदवारांची चाचपणी करण्यासाठी ठाकरे गटाची, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाची लवकरच बैठक आयोजित करणार असल्याचे राजेंद्र दळवी व किरण काळे यांनी सांगितले.आगामी महापालिका निवडणुकीसाठी शिवसेनेचा ठाकरे गट व रिपब्लिकन पक्षाच्या गवई गटाने आघाडी करण्याचा निर्णय घेतला आहे. ठाकरे गटाचे महानगर प्रमुख किरण काळे व गवई गटाचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी ही माहिती दिली. नगर शहर हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. आता शिवशक्तीबरोबर भीमशक्ती आल्यामुळे ताकद वाढली आहे. या माध्यमातून मनपा निवडणूक जिंकू, असा विश्वास किरण काळे यांनी व्यक्त केला. आंबेडकरी समाज शिवसेनेसोबत खंबीरपणे उभा राहील. समाजाला शिवसेनाच न्याय देऊ शकते, असा विश्वास असल्याने एकत्र येण्याचा निर्णय घेतल्याचे सुशांत म्हस्के यांनी म्हटले आहे. निवडणुकीत अन्य कुणाशी आघाडी करायची याचा निर्णय सर्वस्वी शिवसेनेने घ्यावा. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी म्हणाले, तत्कालीन पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात सगळ्यात आधी शिवशक्ती व भीमशक्तीचा प्रयोग केला.

### नगर शहर सेनेचा बालेकिल्ला

ग्रामीण जिल्ह्यात हा प्रयोग करणार आहोत. मनपा, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीबाबत इच्छुक उमेदवारांची चाचपणी करण्यासाठी ठाकरे गटाची, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाची लवकरच बैठक आयोजित करणार असल्याचे राजेंद्र दळवी व किरण काळे यांनी सांगितले.

## मोदींचे वक्तव्य चर्चेत

## विधानसभेतील विजयानंतर मोदींचे वक्तव्य चर्चेत

# लोकांकडे जगाला राजकारण शिकवण्याची ताकद

### राजकारणाचे विष पसरवल्याचा आरोप

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी एनडीएने प्रचंड मोठा विजय मिळवल्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाआघाडीवर टीका केली आणि म्हटले की, मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर मतदान केल्याने दोन्ही आघाड्यांमध्ये १० टक्के मतांचा फरक आहे. बिहारमधील सत्ताधारी एनडीएने २४३ पैकी २०२ जागा जिंकून निवडणुकीत मोठा विजय मिळवला.**



सुरत विमानतळावरील एका कार्यक्रमात बोलताना, पंतप्रधान मोदींनी काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्यांवर बिहारमध्ये जातीच्या राजकारणाचे विष पसरवल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, बिहारच्या लोकांनी “जातींच्या आधारावर दुभळी पसरवणारे विष” नाकारले आहे.“या निवडणुकीत विजयी एनडीए आणि पराभूत महाआघाडीमध्ये १० टक्के मतांचा फरक आहे. याचा अर्थ असा की सरासरी सर्व मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर मतदान केले”, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.“बिहार आज जगभरात प्रसिद्ध आहे. जगात कुठेही जा, तुम्हाला बिहारची प्रतिभा दिसेल. बिहार आता विकासाची नवी उंची गाठण्यास तयार आहे. बिहारच्या निवडणुकीत महिला आणि तरुणांचा असा संगम पाहायला मिळाला, ज्यामुळे येत्या काही दशकांसाठी राजकारणाचा पाया मजबूत झाला आहे”, असे ते पुढे म्हणाले.भारतीय जनता पार्टी आणि संयुक्त जनता दलाच्या नेतृत्वाखालील एनडीएने २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केली. बिहार निवडणुकीचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. यामध्ये एनडीएने २४३ पैकी २०२ जागा जिंकत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली.

एनडीएने जिंकलेल्या २०२ जागांपैकी भाजपाला ८९ जागांवर विजय मिळाला, तर मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाने ८५ जागा जिंकल्या. या दोन्ही पक्षांनी प्रत्येकी १०१ जागा लढवल्या होत्या. केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाने (रामविलास) लढवलेल्या २९ जागांपैकी १९ जागा जिंकल्या, जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्थानी अवाम मोर्चाने ५ जागा जिंकल्या तर राष्ट्रीय लोक मोर्चाने ४ जागा जिंकल्या.दुसरीकडे, राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला मोठा पराभव पत्करावा लागला. त्यांना केवळ ३५ जागांवर विजय मिळवता आला. महाआघाडीतील सर्वात मोठा पक्ष राष्ट्रीय जनता दलाला केवळ २६ जागांवर विजय मिळाला. २०२० च्या निवडणुकीत ७५ जागांसह राष्ट्रीय जनता दल बिहारमधील सर्वात मोठा पक्ष ठरला होता. तर गेल्या निवडणुकीत १९ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला यंदा केवळ ६ जागांवर यश मिळाले.बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी एनडीएने प्रचंड मोठा विजय मिळवल्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाआघाडीवर टीका केली आणि म्हटले की, मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर मतदान केल्याने दोन्ही आघाड्यांमध्ये १० टक्के मतांचा फरक आहे. बिहारमधील सत्ताधारी एनडीएने २४३ पैकी २०२ जागा जिंकून निवडणुकीत मोठा विजय मिळवला. सुरत विमानतळावरील एका कार्यक्रमात बोलताना, पंतप्रधान मोदींनी काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्यांवर बिहारमध्ये जातीच्या राजकारणाचे विष पसरवल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, बिहारच्या लोकांनी “जातींच्या आधारावर दुभळी पसरवणारे विष” नाकारले आहे.“या निवडणुकीत विजयी एनडीए आणि पराभूत महाआघाडीमध्ये १० टक्के मतांचा फरक आहे. याचा अर्थ असा की सरासरी सर्व मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर मतदान केले”, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.“बिहार आज जगभरात प्रसिद्ध आहे. जगात कुठेही जा, तुम्हाला बिहारची प्रतिभा दिसेल. बिहार आता विकासाची नवी उंची गाठण्यास तयार आहे. बिहारच्या निवडणुकीत महिला आणि तरुणांचा असा संगम पाहायला मिळाला, ज्यामुळे येत्या काही दशकांसाठी राजकारणाचा पाया मजबूत झाला आहे”, असे ते पुढे म्हणाले.

### बिहार निवडणुकीत काय घडले?

एनडीएने २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केली. बिहार निवडणुकीचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. यामध्ये एनडीएने २४३ पैकी २०२ जागा जिंकत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली.एनडीएने जिंकलेल्या २०२ जागांपैकी भाजपाला ८९ जागांवर विजय मिळाला, तर मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाने ८५ जागा जिंकल्या. या दोन्ही पक्षांनी प्रत्येकी १०१ जागा लढवल्या होत्या. केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाने (रामविलास) लढवलेल्या २९ जागांपैकी १९ जागा जिंकल्या.

# लालू यादव यांच्या घरातील ‘जयचंद’ कोण?

## निकालानंतर मुलानं केला उल्लेख, आता मुलीनंही सोडली साथ

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय जनता दलाला खूप मोठा धक्का बसला. २०२० साली ७५ जागा जिंकून सत्ता स्थापन करणाऱ्या पक्षाला यावेळी फक्त २५ जागांवर समाधान मानावे लागले आहे. तसेच पक्षाचे सर्वेसर्वा तेजस्वी यादव यांना स्वतःच्या मतदारसंघात विजय प्राप्त करताना काही वेळ संघर्ष करावा लागला होता.**

निकालाच्या दुसऱ्या दिवशी याता लालू यादव यांच्या पक्षाला आणि कुटुंबाला धक्के बसण्यास सुरुवात झाली आहे.तेजस्वी यादव यांची मोठी बहीण आणि वडील लालू यादव यांना स्वतःची किडनी दान करणाऱ्या रोहिणी आचार्य यांनी राजकारणातून बाजूला जात असल्याची घोषणा केली आहे. तसेच कुटुंबियांशीही आपण सर्व संबंध तोडत आहोत, असेही रोहिणी आचार्य यांनी जाहीर केले आहे. हे जाहीर करताना त्यांनी पक्षातील दोन लोकांच्या नावांचा उल्लेख केला आहे.काही महिन्यांपूर्वी लालू प्रसाद यादव यांनी स्वतःच्या मोठ्या मुलाची पक्षातून हकालपट्टी केली होती. सार्वजनिक जीवनातील संकेत न पाळल्याबद्दल मुलाला पक्ष आणि कुटुंबातून बेदखल करत असल्याचे लालू प्रसाद यादव यांनी



जाहीर केले होते. तेजप्रताप यादव यांना बाहेर काढल्यानंतर त्यांनी स्वतःचा जनशक्ती जनता दल हा पक्ष स्थापन केला होता.नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत तेजप्रताप यादव यांचा जनशक्ती जनता दल पक्षही मैदानात उतरला होता. मात्र तेजप्रताप यादव यांना स्वतःला महुआ विधानसभेतून पराभव सहन करावा लागला. तसेच त्यांच्या पक्षाचा एकही उमेदवार निवडून येऊ शकला नाही. यानंतर तेजप्रताप यांनी पक्षाच्या फेसबुकवर एक लांबलचक पोस्ट करत आरजेडीवर टीका केली आहे.जनशक्ती जनता दलाच्या फेसबुक पेजवर केलेल्या कथित पोस्टमध्ये तेजप्रताप म्हणाले, “मी पराभूत होऊनही जिंकलो आहे. कारण माझ्याबरोबर जनतेचे प्रेम, विश्वास, आशीर्वाद आहे. सत्य कटू आहे. आरजेडीमधील जयचंद लोकांनी पक्षाला आतून पोखरले आहे. यामुळेच तेजस्वी फेलस्वी झाला. ज्यांनी खुर्ची आणि राजकारण वाचविण्यासाठी स्वतःच्या घरालाच आग लावली, इतिहास त्यांना कधीही माफ करणार नाही. मी नेहमी सांगतो जनताच मायबाप असते. आज मायबाप जनतेने दिलेला निर्णय मी स्वीकारत आहे.”बिहारच्या जनतेने सुशासन देणारे सरकार निवडले आहे.

### तेजस्वी फेलस्वी झाला

आम्ही त्याचा सन्मान करतो. हा विजय आपले कर्मठ पंतप्रधान आणि जगातील सर्वात शक्तीशाली नेते नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या जादूई नेतृत्वामुळे शक्य झाला आहे. त्यांना माझ्या शुभेच्छा..”, या शब्दात तेजप्रताप यादव यांनी एनडीएचे कौतुक केले.

# 'लपंडाव' मालिकेसाठी रुपाली भोसलेने घेतली मेहनत

स्टार प्रवाहच्या 'लपंडाव' मालिकेत प्रेक्षकांना काही दिवसांपूर्वीच एक मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला. सरकार आपल्या मुलीशी इतकं वाईट का वागते असा प्रश्न ही मालिका सुरू झाल्यापासून प्रत्येकाला पडला होता. मात्र, सरकार ही सखीची खरी आई नसल्याचं आता स्पष्ट झालेलं आहे. खऱ्या तेजस्विनीला सरकारने म्हणजेच मनस्विनीने आपल्या ताब्यात ठेवलेलं असतं. रुपाली भोसले सध्या मालिकेत तेजस्विनी ( सखीची खरी आई ) व मनस्विनी ( सरकार ) अशा दोन भूमिका साकारत आहे. सखीची खरी आई गेली कित्येक वर्षे मनस्विनीच्या ताब्यात असते. याचा उलगडा नुकताच मालिकेत करण्यात आला. 'लपंडाव' मालिकेचा हा विशेष भाग प्रत्येकाला आवडला. मात्र, ही दुहेरी भूमिका साकारण्यासाठी अभिनेत्री रुपाली भोसलेने प्रचंड मेहनत घेतली होती. विशेष म्हणजे तिला एकाच दिवशी तब्बल ५ वेगवेगळ्या लूक्समध्ये तयार होऊन शूट करायचं होतं.रुपालीचे ५ वेगवेगळे लूक्स कोणते होते आणि अभिनेत्रीने यासाठी कशी तयारी केली याबद्दल रुपाली भोसलेने पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे.रुपाली भोसले लिहिते, "अशक्य ते शक्य! एकाच दिवशी पाच वेगवेगळे लूक्स शूट करणं म्हणजे खरंच एका



वेगळ्या प्रवासातून जाण्यासारखं होतं. एक कलाकार म्हणून अशा क्षणी जाणवतं की, मी हे काम इतकं का प्रेमाने करते? थकवा होतो? हो... पण हा थकवा मनाला पूर्णपणे समाधान देणारा असतो. प्रत्येक लूक, प्रत्येक फ्रेम, प्रत्येक भावना सगळ्यासाठी खूप मेहनत घेतली. प्रत्येक लूकसाठी नव्याने तयार करावी लागली आणि ही संधी मिळाल्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. माझी संपूर्ण टीम... मेकअप आर्टिस्ट, हेअर डिपार्टमेंट, स्टायलिस्ट, ADS, लेखक, क्रिएटिव टीम, दिग्दर्शक, DOP, निर्माते, स्टार प्रवाहची संपूर्ण टीम आणि या सगळ्या पात्रांवर आणि कलाकार म्हणून माझ्यावर भरभरून प्रेम करणारे मायबाप प्रेक्षक! तुमच्या पाठिंब्याशिवाय हे शक्यच नव्हतं. माझ्यावर विश्वास ठेवून मला प्रत्येकवेळी माझं सर्वोत्तम देण्यासाठी प्रेरणा दिल्याबद्दल खूप प्रेम. आज सेटवर उभं राहून, एका पात्रातून दुसऱ्यात जाताना, मनात एकच भावना होती.... कृतज्ञता! या प्रवासासाठी, या संधींसाठी आणि यामागे उभ्या असलेल्या प्रत्येकाला सलाम! प्रत्येक व्यक्तीची मेहनत यामागे होती... शब्दांच्या पलीकडे कृतज्ञ. LOVE YOU ALL विठ्ठल सर, सोमनाथ, आशु, आकाश, डीओपी भरतजी आणि त्यांची टीम"दरम्यान, रुपालीने शेअर केलेल्या पोस्टवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. "खरंच तुम्हाला सॅल्युट आहे", "मस्त व्हिडीओ बनवला मॅडम तुमची मेहनत फळाला आली", "याला म्हणतात डेडीकेशन" अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर दिल्या आहेत.

## तो चांगला अभिनेता आहे पण

अभिनेता आर माधवन हा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. त्यांने त्याच्या सहज सुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आर माधवनचा मोठा चाहतावर्ग आहे. नुकताच त्याचा 'आप जैसा कोई' हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. आर माधवन चित्रपट तसेच इंडस्ट्रीतील कलाकारांबद्दल आपली मतं मांडत असतो. आता त्याने बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंहबद्दल केलेलं वक्तव्य चर्चेत आहे. आर माधवन लवकरच 'धुरंदर' चित्रपटात झळकणार आहे. आदित्य धरने या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. यामध्ये अभिनेता रणवीर सिंह मुख्य भूमिकेतून झळकणार आहे. या सिनेमात आर माधवन व रणवीर सिंह पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. आर माधवनने नुकतच रणवीर सिंहबद्दल वक्तव्य केलं आहे.'इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार आर माधवन रणवीर सिंहबद्दल म्हणाला, "मला वाटत नाही की, रणवीर सिंहला कधी नकार मिळाले असतील.

## माझ्याशी लग्न करशील?



सोशल मीडियाद्वारे अनेक चाहते आपल्या आवडत्या कलाकारांना लग्न करण्याची मागणी करताना दिसतात. चाहत्यांच्या या मागणीला कलाकार मंडळी अनेकदा मजेदार किंवा हलक्या-फुलक्या पद्धतीने उत्तर देतात. असंच काहीसं झालं आहे अभिनेत्री जिनिलीया देशमुख हिच्याबरोबर. साऊथ आणि बॉलीवूडसह मराठी इंडस्ट्रीत आपल्या अभिनयाने आणि मनमोहक सौंदर्यानं अनेकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे जिनिलीया देशमुख. आपल्या अभिनयाने चर्चेत राहणारी जिनिलीया सोशल मीडियावरही तितकीच सक्रीय असते. सोशल मीडियावर ती तिचे अनेक स्टायलिश फोटो शेअर करत असते. त्याचबरोबर ती रितेशबरोबरही काही मजेशीर व्हिडीओ शेअर करत असते. अशातच जिनिलीयाने सोशल मीडियाद्वारे चाहत्यांशी संवाद साधला.अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवरील आस्क मी सेशनद्वारे चाहत्यांना प्रश्न विचारण्यास सांगितलं. अशातच एका चाहत्याने जिनिलीयाला चक्क लग्नाची मागणी घातली आहे. इन्स्टाग्राम स्टोरीवर चाहत्याने असं म्हटलं की, "माझं तुझ्यावर प्रेम आहे, लग्न करशील का?" चाहत्याच्या या प्रश्नाला उत्तर देत जिनिलीया असं म्हणाली, "मी विचार केला असता; पण माझं सर्वात सुंदर व्यक्तीबरोबर लग्न केलं आहे."जिनीलियाने दिलेल्या या उत्तरातून त्याचं रितेशवरील प्रेम दिसून येतं. यानंतर तिला आणखी एका चाहत्याने नात्याबद्दल सल्ला विचारला. यावर जिनिलीयाने "कोणाचाही सल्ला ऐकू नका. तुम्ही स्वत: त्या नात्याचा अनुभव घ्या" असं म्हणाली. दरम्यान, रितेश-जिनिलीयाकडे एक आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं.

## कलाकारांना फक्त ऐकूनच घ्यावं लागतं

प्रसिद्ध राशीचक्रकार शरद उपाध्ये यांनी काही दिवसांपूर्वीच फेसबूक पोस्ट शेअर करत निलेश साबळेवर टीका केली होती. यानंतर निलेशने सविस्तर व्हिडीओ शेअर करत याप्रकरणी आपली बाजू स्पष्ट केली. कोणतीही पोस्ट लिहिताना नीट माहिती घेणं आवश्यक आहे. सरांचा मी फॅन होतो आणि कायम राहीन असंही अभिनेत्याने त्याच्या व्हिडीओमध्ये सांगितलं होतं. आता नुकत्याच 'लोकशाही'ला दिलेल्या मुलाखतीत डॉ. निलेश साबळेने हा विषय माझ्यासाठी कायमचा संपला असून मी कायम शरद उपाध्ये सरांचा आयुष्यभर आदर करेन असं सांगत पुन्हा एकदा या प्रकरणावर भाष्य केलं आहे.शरद उपाध्ये प्रकरणाविषयी बोलताना निलेश साबळे म्हणाला, "मी तो विषय आता विसरून गेलोय, तुम्ही विचारलात म्हणून...कारण, एखादी गोष्ट तेव्हाच थांबते जेव्हा आपण त्याविषयीचं बोलणं थांबवतो. मी त्या व्हिडीओमध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्माननीय शरद उपाध्ये सरांनी यापूर्वी सुद्धा दोन-तीनवेळा अशा पोस्ट केल्या होत्या. तेव्हा मी गोष्टी सोडून दिल्या होत्या. सहा वर्षांपूर्वी सुद्धा त्यांनी अशीच एक पोस्ट लिहिली होती... त्यातही त्यांनी बरंच काही म्हटलं होतं."अभिनेता पुढे म्हणाला, "शेवटी सांगायचं काय तर कलाकारांना फक्त ऐकूनच घ्यावं लागतं. कलाकार व्यक्त झाले तरी समस्या निर्माण होते आणि एखादा कलाकार व्यक्त झाला नाही तरी समस्या निर्माण होतात. पूर्वी या गोष्टी व्हायच्या नाहीत. पण, आता काय झालंय... प्रत्येकाच्या हातात मोबाइल आहे. त्यामुळे मला अमिताभ बच्चन यांच्याबद्दल जरी लिहायचं असेल तरी मी पटकन लिहू शकतो. माझी पोस्ट जर त्यांच्यापर्यंत पोहोचली.

## राशाच्या जबरदस्त डान्सने वेधलं लक्ष



बॉलीवूडच्या कलाकारांची मुलं आता मोठ्या पडद्यावर पाहायला मिळत आहेत. २०२३मध्ये शाहरुख खानची मुलगी सुहाना खान, अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा, श्रीदेवींची मुलगी खुशी कपूर यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर गेल्या वर्षी आमिर खानचा मुलगा जुनैद खानने 'महाराज' चित्रपटाच्या माध्यमातून इंडस्ट्रीत पाऊल ठेवलं. आता रवीना टंडनची १९ वर्षांची मुलगी मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या पहिल्या-वहिल्या चित्रपटातील गाणं प्रदर्शित झालं असून तिच्या जबरदस्त डान्सने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. नेटकरी रवीना टंडनच्या मुलीची तुलना सुहाना खान, खुशी कपूरसह कतरिना कैफबरोबर करत आहेत. रवीना टंडनच्या १९ वर्षीय मुलीचं नाव राशा थडानी आहे. ती 'आजाद' या चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी तयार झाली आहे. याच चित्रपटातील तिचं पहिलं गाणं 'उई अम्मा' प्रदर्शित झालं आहे. या गाण्यावर राशाचा डान्स पाहून नेटकरी भरभरून कौतुक करत आहेत. तिने आपल्या डान्ससह हावभावाने सगळ्यांची मनं जिंकली आहेत.राशा थडानीचं 'उई अम्मा' गाणं ४ जानेवारीला प्रदर्शित झालं. मधुबंती बागने हे गाणं गायलं असून अमित त्रिवेदीने संगीतबद्ध केलं आहे. तर अमिताभ भट्टाचार्य गीतकार आहेत. या गाण्यातील जबरदस्त डान्समुळे राशा चांगलीच भाव खाऊन गेली आहे. त्यामुळेच तिचं कौतुक होतं आहे.राशाचं 'उई अम्मा' गाणं पाहून एका नेटकऱ्याने लिहिलं की, हे खरं पदार्पण आहे. तिचे हावभाव जबरदस्त आहेत. तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "सुहाना खान आणि खुशी कपूरपेक्षा राशाने खूप छान परफॉर्मन्स केला आहे.

## आयपीएल २०२६

## रिलीज केलेल्या खेळाडूंची संपूर्ण यादी

# रसेल-मिलर-आकाशदीप संघाबाहेर

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२६ पूर्वी सर्व संघांच्या रिटेन व रिलीज केलेल्या खेळाडूंची घोषणा करण्यात आली आहे. सर्व संघांनी चकित करत अनेक मोठ्या खेळाडूंना रिलीज केलं आहे. मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू व पंजाब किंग्स हे संघ पुढील हंगामासाठी जवळपास निश्चित झाले आहेत. तर चेन्नई सुपर किंग्स व कोलकाता नाईट रायडर्स संघाने मोठ्या खेळाडूंना रिलीज करत चाहत्यांना व क्रिकेटप्रेमींना धक्का दिला आहे. आंद्रे रसेल, वेंकटेश अय्यर, मथीशा पथिराना, डेव्हॉन कॉन्वे, रचिन रवींद्र यांना रिलीज केलं आहे.**

## रचिन रवींद्र यांना रिलीज केलं



मुंबई इंडियन्स:रोहित शर्मा, तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव, हार्दिक पंड्या, नमन धीर, शार्दुल ठाकूर (ट्रेड), शेरफन रूदरफोर्ड (ट्रेड), मयंक मार्कंडे (ट्रेड), दीपक चहर, जसप्रीत बुमराह, कर्ण शर्मा, ट्रेंट बोल्ट, विल जॅक्स, मिचेल सँटनर, कार्बिन बॉश, राज अंगद बावा, अल्लाह गजनफर, अश्वनी कुमार, रघु शर्मादिल्ली कॅपिटल्स ट्रिस्टन स्टब्स, समीर रिझवी, करूण नायर, डोनावन फरेरा, नितीश राणा (ट्रेड), केएल राहुल, अभिषेक पोरेल, अक्षर पटेल, आशुतोष शर्मा, विपराज निगम, माधव तिवारी, त्रिपुराना विजय, अजय मंडल, कुलदीप यादव, मिचेल स्टार्क, मुकेश कुमार, दुश्मंता चमीरा, टी नटराजनलखनौ सुपर जायंट्स अब्दुल समद, आयुष बडोनी, एडन मारक्रम, हिम्मत सिंह, मॅथ्यू ब्रिटझके, ऋषभ पंत, निकोलस पुरन, मिचेल मार्श, शाहबाज अहमद, अर्शीन कुलकर्णी, अर्जुन तेंडुलकर (ट्रेड), मोहम्मद शमी (ट्रेड), मयंक यादव, आवेश खान, दिग्वेश राठी, मोहसीन खान, एम सिद्धार्थ, प्रिंस यादव, आकाश सिंहचेन्नई सुपर किंग्स महेंद्रसिंग धोनी, ऋतुराज गायकवाड, आयुष म्हात्रे, डेवाल्ड ब्रेव्हिस, उर्विल पटेल, संजू सॅमसन (ट्रेड), डेव्हॉन कॉनवे, शिवम दुबे, जेमी ओव्हर्टन, रामकृष्ण घोष, नूर अहमद, खलील अहमद, अंशुल कंबोज, गुरजनप्रीत सिंग, नॅथन एलिस, श्रेयस गोपाळ, मुकेश चौधरीपंजाब किंग्स श्रेयस अय्यर, नेहाल वधेरा, प्रियांश आर्या, प्याला अविनाश, मुशीर खान, हरनूर पन्नू, प्रभसिमरन सिंह, जोश इंग्लिस, विष्णु विनोद, मार्कस स्टॉयनिस,मार्को यान्सन, शशांक सिंह, अजमतुल्ला उमरजाई, हरप्रीत ब्रार, सूर्यांश शेडगे, अर्शदीप सिंह, युजवेंद्र चहल, लॉकी फर्ग्युसन, विजयकुमार वैशाख, यश ठाकूर, जेवियर बार्टलेटरॉयल चॅलेंजर्स बंगळुरू फिल सॉल्ट, विराट कोहली, रजत पाटीदार, जितेश शर्मा, टिम डेव्हिड, कृणाल पंड्या, जेकब बेथल, रोमारियो शेफर्ड, स्वप्नील सिंग, भुवनेश्वर कुमार, जोश हेझलवूड, यश दयाल, सुयश शर्मा, देवदत्त पडिक्कल, रसिक दार, नुवान तुषारा, नुवान तुषारा, अभिनंदन सिंग.राजस्थान रॉयल्स शुभम दुबे, रवींद्र जडेजा (ट्रेड इन), सॅम करन (ट्रेड इन) शिमोरन हेटमायर, यशस्वी जैस्वाल, ध्रुव जुरेल, रियान पराग, ल्युहान डी प्रिटोरस, वैभव सूर्यवंशी, डोनाव्हन फरेरा (ट्रेड इन),नांद्रे बर्गर, तुषार देशपांडे, युधवीर सिंग, जोफ्रा आर्चर, संदीप शर्मा, क्वेना मफाका.कोलकाता नाईट रायडर्सअजिंक्य रहाणे, अंगक्रिश रघुवंशी, अनुकूल रॉय, हर्षित राणा, मनीष पांडे, रमणदीप सिंग, रिंकू सिंग, रोव्हमन पॉवेल, सुनील नरिन, उमरान मलिक, वैभव अरोरा, वरूण चक्रवर्तीसनरायझर्स हैदराबाद ट्रॅव्हिस हेड, अभिषेक शर्मा, अनिकेत वर्मा, आर.स्मरण, इशान किशन, हेनरिच क्लासन, नितीश कुमार रेड्डी, हर्ष दुबे, कामिंदू मेंडिस, हर्षल पटेल, ब्रायडन कार्स, पॅट कमिन्स, जयदेव उनाडकत, इशान मलिंगा, झीशान अन्सारीगुजरात टायटन शुबमन गिल, साई सुदर्शन, कुमार कुशाग्र, अनुज रावत, जोस बटलर, निशांत सिंधू, वॉशिंग्टन सुंदर, अर्शद खान, शाहरुख खान, राहुल टेवाटिया, कागिसो रबाडा, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, गुरनूर सिंग ब्रार, रशीद खान, मानव सुतार, साईकिशोर, जयंत यादवकर्णधार आणि विकेटकीपर संजू सॅमसनने रिलीज करण्याची विनंती केल्याने राजस्थान रॉयल्सने २०२६ हंगामापासून नवी सुरुवात करावी लागणार आहे. संजू चेन्नई सुपर किंग्सच्या ताफ्यात दाखल झाला आहे. संजू नसल्यामुळे राजस्थानला नवा कर्णधार शोधावा लागणार आहे. यशस्वी जैस्वाल आणि रियान पराग यांची नावं चर्चेत आहेत. ध्रुव जुरेलचंही नाव शर्यतीत आहे. गेल्यानंतर राजस्थानच्या ताफ्यात रवींद्र जडेजासारखा अनुभवी अष्टपैलू खेळाडू दाखल झाला.

## सॅमसनची जागा कोण घेणार?

आयपीएल २०२६ पूर्वी सर्व संघांच्या रिटेन व रिलीज केलेल्या खेळाडूंची घोषणा करण्यात आली आहे. सर्व संघांनी चकित करत अनेक मोठ्या खेळाडूंना रिलीज केलं आहे. फिरकीची बाजू अतिशय मजबूत झाली आहे. सॅम करनच्या रुपात त्यांच्याकडे अष्टपैलू वेगवान गोलंदाज आहे. जोफ्रा आर्चरला दुखापतींची शक्यता नेहमीच असते. अशा परिस्थितीत एका वेगवान गोलंदाजाच्या राजस्थान प्रतीक्षेत आहे. राजस्थानने नितीश राणाला दिल्लीबरोबर ट्रेड केलं आहे.

# भारताचा नवा 'सिक्सर किंग', ऋभष पंत

## असा विक्रम करणारा ठरला पहिलाच भारतीय फलंदाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघातील स्टार यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतने कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना कोलकात्यातील ईडन गार्डन्सच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यातील दुसऱ्या दिवशी फलंदाजी करताना ऋषभ पंतने नवा सिक्सर किंग बनण्याचा मान पटकावला आहे.**



कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत वीरेंद्र सेहवाग अव्वल स्थानी होता. सेहवागच्या नावे ९० षटकार मारण्याची नोंद होती. आता ऋषभ पंतने हा विक्रम मोडून काढला आहे. इंग्लंड दौऱ्यावर असताना, पंतने सेहवागच्या सर्वाधिक षटकार मारण्याच्या विक्रमाची बरोबरी केली होती. आता दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या पहिल्याच सामन्यात १ षटकार मारताच त्याने सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे.स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जाणारा सेहवागच्या नावे कसोटी क्रिकेटमध्ये ९० षटकार मारण्याची नोंद होती. तर ऋषभ पंतने आतापर्यंत ९१ षटकार मारले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत रोहित शर्मा, एमएस धोनी सारख्या खेळाडूंचा समावेश आहे.पंतने केशव महाराजच्या गोलंदाजीवर स्टेपआऊट होऊन गगनचुंबी षटकार मारून हा विक्रम आपल्या नावावर केला. त्यानंतर त्याने आणखी एक षटकार मारला.या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव अवघ्या १५९ धावांवर आटोपला.

## वॉशिंग्टन सुंदरने २९ धावा केल्या

पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाने आतापर्यंत ४ गडी बाद १५० धावांपर्यंत मजल मारली आहे.पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाकडून सलामीवीर यशस्वी जैस्वाल अवघ्या १२ धावा करत माघारी परतला. त्यानंतर केएल राहुल आणि वॉशिंग्टन सुंदरने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. केएल राहुलने ३९ धावांची खेळी केली. तर वॉशिंग्टन सुंदरने २९ धावा केल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। रविवार।
। दि. 16 नोव्हेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


### मुलं म्हणजे आनंद उत्साहाचे प्रतीक या भावनेतून कार्यक्रमाचे आयोजन

# खेळ, नृत्य आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमात विद्यार्थी रमले!

## शिक्षण विश्व : संत साई शाळेत बाल दिन उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**संत साई इंग्लिश मिडियम हायस्कूल भोसरी येथे बाल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुलं म्हणजे आनंद उत्साहाचे प्रतीक असून त्यांना प्रेम वेळ आणि प्रोत्साहन देणे ही सर्वांची जबाबदारी आहे या हेतूने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**




स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी बाल दिन साजरा केला जातो. त्यांना लहान मुलांप्रती विशेष प्रेम असल्याने हा दिवस मुलांचा सण म्हणून ओळखला जातो. शाळेत आगमन झाल्यावर शिक्षकांनी मुलांचे औक्षण करून स्वागत केले. वर्ग शिक्षकांनी वर्गांची आकर्षक सजावट केली होती. सुरांच्या तालावर नाचत मुलांनी आनंदाने वर्गात प्रवेश केला. शिक्षकांनी हसतमुखाने विद्यार्थ्यांचे स्वागत केले. मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर यांनी पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला तसेच शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवकन्या कांगणे यांनी केले तर आभारप्रदर्शन नम्रता ओव्हाळ यांनी केले.

मुलांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. मुलांनी गाणी म्हटली नृत्य सादर केले तसेच जादूचा कार्यक्रम आणि बाउन्सी मिकी माउसचा आनंद लुटला. लहानग्यांच्या हातावर नैसर्गिक रंगांनी टॅटू काढण्यात आले. मुख्याध्यापक ढवळेश्वर यांनी सर्व विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या नियोजनात शाळेच्या संचालिका सुनीता ढवळेश्वर विश्वस्त पायल ढवळेश्वर भारती ढवळेश्वर तसेच संजय अनार्थे मनोज वाबळे आणि मालन लिगाडे यांचे सहकार्य लाभले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा “टायगर इज बॅक” !

## माजी आमदार विलास लांडे यांची जिल्हा निवडणूक समन्वयकपदी नियुक्ती!

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीसोबत दोन हात करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.) “हुकमी एक्का” मैदानात उतरवला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी आमदार विलास लांडे यांची “पिंपरी-चिंचवड जिल्हा समन्वयकपदी” नियुक्ती केली आहे. परिणामी, राष्ट्रवादीचा “टायगर इज बॅक” उत्स्फूर्त प्रतिक्रिया लांडे**




“आगामी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा समन्वयक म्हणून जबाबदारी दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनीलजी तटकरे यांचे मनःपूर्वक आभार. ही जबाबदारी पूर्ण समर्पणाने आणि यशस्वीपणे पार पाडण्याचा माझा ठाम निर्धार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी, नवीन पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आणि नागरिकांच्या विश्वासाला तंतोतंत उत्तर देण्यासाठी आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठिशी ठामपणे उभे राहू, असा मला पूर्ण विश्वास आहे. माझ्यासोबत समन्वयक म्हणून निवड झालेल्या सर्व सहकाऱ्यांचेही मनापासून अभिनंदन आणि शुभेच्छा!”
**–विलास लांडे,** माजी आमदार. जिल्हा समन्वयक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी जंबो कार्यकारिणी जाहीर केली होती. त्यामध्ये माजी आमदार विलास लांडे यांची नियुक्ती “मुख्य समन्वयक” अशी दर्शवण्यात आली. त्या पत्रकार परिषदेमध्ये लांडे उपस्थित राहीले नाहीत.

शहरातील राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव आणि मुत्सद्दी नेता म्हणून ओळख असलेल्या माजी आमदार विलास लांडे यांनी राजकीय तुलनेत ज्युनिअर असलेल्या योगेश बहल यांच्या कार्यकारिणीत काम करायला लावणे, ही राष्ट्रवादीची “विनाशकाले विपरित बुद्धी” आहे. लांडे यांना हेतुत: राजकीयदृष्ट्या “साईड रोल” दिला जात आहे का? असा सवाल उपस्थित करणारे परखड राजकीय विश्लेषण “महाईन्यूज” च्या माध्यमातून दि. 13 नोव्हेंबर 2025 च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले होते. या वृत्ताची शहराच्या राजकारणात चांगलीच चर्चा झाली. किंबहुना, लांडे यांच्यावर अन्याय होतो आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जावू लागला.

विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात स्थानिक पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेसला प्रभावी नेता हवा. जो भाजपाशी दोन हात करु शकेल, असे भाष्यही ‘महाईन्यूज’ ने केले. त्याला मूर्तस्वरुप आले. दि. 14 नोव्हेंबर रोजी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची “प्रचार प्रमुख” पदी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर माजी आमदार विलास लांडे यांना “जिल्हा समन्वयक” म्हणून मैदानात उतरवण्यात आले.

**जगताप- लांडगे यांच्या विरोधात काटे-लांडे यांची जोडी..!**

पुणे जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचा प्रमुख प्रतिस्पर्धी भारतीय जनता पार्टीच्या “जिल्हा निवडणूक प्रभारी”पदी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची नियुक्ती केली आहे. त्यानंतर पुणे दक्षिण आणि पुणे उत्तर असे भाजपाचे दोन संघटनात्मक संरचना आहेत. त्यामध्ये पुणे दक्षिण जिल्हा निवडणूक प्रमुखपदी आमदार राहुल कुल आणि पुणे उत्तर जिल्हा निवडणूक प्रमुखपदी आमदार महेश लांडगे यांची नियुक्ती झाली आहे. विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवड जिल्हा निवडणूक प्रमुखपदी आमदार शंकर जगताप आहेत. राष्ट्रवादीच्या संघटनात्मक संरचनेमध्ये निवडणूक प्रभारीला समांतर निवडणूक समन्वयक आहेत. भाजपाला आव्हान देण्यासाठी आता प्रचार प्रमुख म्हणून माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आणि पिंपरी-चिंचवड जिल्हा समन्वयकपदी माजी आमदार विलास लांडे यांना जबाबदारी सोपवली आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत भाजपासमोर तगडे आव्हान होवू शकते, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

## शहर जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्विकारल्यानंतर

# 180 दिवसात 194 कार्यक्रम

## शत्रुघ्न काटे यांच्या सहामाही कामकाजाचा विक्रम..!

। पिंपरी चिंचवड ।
विशेष प्रतिनिधी : महाईन्यूज

**१६ मे रोजी आमदार व प्रदेश भाजपचे निरीक्षक सिद्धार्थ शिरोळे यांच्या हस्ते अध्यक्ष निवडीचे पत्र श्री.काटे यांना देण्यात आले. उद्या (१६ नोव्हेंबर)पक्षाचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतल्याच्या घटनेला सहा महिने पूर्ण होत आहेत.**



ज्येष्ठ नगरसेवक असलेल्या. काटे यांनी शहराध्यक्ष पदाची सूत्रे स्विकारल्यानंतर त्यांचा पहिला सत्कार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जिल्हा कार्यालयात भार्गव सदन येथे पार पडला. तर दुसरा सत्कार स्वातंत्र्यवीर सावरकर सामाजिक संस्थेतर्फे झाल्यानंतर संघटनात्मक कामकाजात त्यांनी स्वतःला झोकून दिले. कार्यकर्त्यांचे संघटन, बांधणी, जनसेवा आणि पक्षनिष्ठा या चार सूत्रांवर काम करण्यास काटे यांनी प्रारंभ केला. आपल्या नेतृत्वाखाली कार्यकारिणी निवडताना त्यांनी शहर पातळीवर काम करू इच्छिणाऱ्या तीनशेपेक्षा अधिक कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या व त्यामधून आपल्या टीमची बांधणी केली. अशा प्रकारच्या या वैशिष्ट्यपूर्ण निवड प्रक्रियेची पक्ष पातळीवर राज्य स्तरावर नोंद घेण्यात आली. मागील सहा महिन्यातील प्रमुख कामांमध्ये सर्वाधिक यशस्वी झालेला संपूर्ण शहरभर पडसाद उमटलेला कार्यक्रम म्हणजे भारतीय सैन्य दलाला वंदन करण्यासाठी शहर भाजपने आयोजित केलेली तिरंगा पदयात्रा होय. भाजपचे मित्र पक्ष व त्यांचे कार्यकर्ते देखील यामध्ये सहभागी झाले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अहिल्यादेवी स्मारक स्वच्छता अभियान तसेच चौंडी येथे महिलांचा विशेष भेट दौरा हा कार्यक्रमही महत्वपूर्ण म्हणून नोंदला गेला. आत्मनिर्भर भारत ते विकसित भारत कार्यशाळा, पश्चिम महाराष्ट्र विभागातील सर्व नवनियुक्त मंडल अध्यक्षांची कार्यशाळा, आणीबाणीतील लढवय्यांचा गौरव, संकल्प सिद्धी ते चौपाल सभा, पंतप्रधान मोदी यांच्या अकरा वर्षाच्या कारकीर्दी निमित्त विविध उपक्रमांचा धडाका,समरसता रक्षाबंधन उपक्रमांतर्गत १ लाख ४५ हजार राख्या संकलन अभियान,ऑपरेशन सिंदूर विजयोत्सव, स्वातंत्र्यसैनिक स्मारक स्वच्छता अभियान, राष्ट्रपिता ते राष्ट्रनेता उपक्रम, पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा अभियान, आत्मनिर्भर भारत अभियान, जीएसटी अभियान आदी प्रमुख पक्षीय कामकाज संघटनेच्या माध्यमातून त्यांनी यशस्वी करून दाखवले. शहर विकास आराखड्याबाबत नागरिकांचे प्रश्न भाजपच्या चारही आमदारांशी समन्वय साधून अधिवेशनात मांडण्यासाठी पुढाकार घेणे,पक्षाचे मेळावे, अधिवेशन, मंडल कामकाजाचे उपक्रम, याचबरोबर गणेशोत्सव, दहीहंडी, दसरा, दिवाळी या सार्वजनिक सण व उत्सवाच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाची प्रतिमा व प्रतिष्ठा उंचावण्यासाठी सक्रिय सहभाग त्यांनी घेतला.चोवीस तास कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे, त्यांना वेळ देणे,या सारख्या कामांमुळे सहामाही काळातच त्यांनी घेतलेली झेप महत्वपूर्ण ठरली गेली.

## “रीड टू लीड” मधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन!

## शिक्षण विश्वः गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्स पुणे यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्स पुणे यांच्या वतीने “आंत्रप्रेनर्स बुकमार्क – एव्हरी पेज बिल्ड्स अ लीडर” हा प्रेरणादायी कार्यक्रम भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे भव्य उत्साहात पार पडला.**




या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक आणि अध्यक्ष विनायक भोंगाळे उपस्थित होते, तर माइंडमॅपर्स करिअर काउन्सेलिंग पुणे संचालक दिनेश ताठे यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना आणि पालकांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी आणि मान्यवरांनी दीप प्रज्वलित करून ज्ञान, संस्कार आणि नेतृत्वाचा प्रकाश पसरविण्याचा संदेश दिला.

यानंतर व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील यांनी स्वागतपर भाषण करून कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्त्व सांगितले आणि आलेल्या पालकांचे मनःपूर्वक स्वागत करत आभार मानले. गायत्री स्कूलच्या विद्यार्थ्यांनी “रीड टू लीड” या विषयावर नृत्य सादरीकरण करून वाचनाचे आणि ज्ञानाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले.

विद्यार्थ्यांनी सामाजिक जीवनातील आर्थिक व्यवहार, बँक कर्ज प्रक्रिया, इम्पोर्ट एक्स्पोर्ट, ट्रेडिंग यांसारख्या विविध व्यावहारिक विषयांवर सादरीकरण केले. “स्वतःची किंमत मार्केटमध्ये कशी वाढवायची” या विषयावर सातवीच्या विद्यार्थ्यांनी आपली स्वतंत्र शैली दाखवत प्रेरणादायी प्रस्तुती दिली.

गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्स अंतर्गत सर्व शाळांमध्ये “रीड टू लीड” उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, वाचनाचे महत्त्व आणि राष्ट्र उभारणीत तरुण पिढीचे योगदान यावर विविध उपक्रम राबवले जातात. हा उपक्रम एक चळवळ म्हणून पुढे चालू राहिला तर येणाऱ्या पिढ्यांना नोकरीवर अवलंबून न राहता नोकरी देणारी पिढी घडविण्याचे कार्य गायत्री स्कूल करत असल्याची प्रतिक्रिया पालकांनी दिली.

चऱ्होली शाखेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले “विश्वास सबसे बड़ा” हे नाटक विशेष लक्षवेधी ठरले. दिनेश ताठे यांनी मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम समजावून सांगत विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा योग्य वापर कसा करावा याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पालकांचा सत्कार करण्यात आला आणि कार्यक्रमाचा समारोप उत्साहात झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष विनायक भोंगाळे, व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली भागवत, विपणन अधिकारी शैलेंद्र सिंग, सर्व शाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शेकडो पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. पालकांनी कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल गायत्री स्कूलच्या व्यवस्थापनाचे मनःपूर्वक आभार मानले.

### भारताचा पाचवा तसेच सर्वात आधी सुरू होणारा

# जयाद्री खोऱ्यात डिसेंबरपासून 'इला उलूक उत्सव' उत्साहात सुरू!

## घुबड संवर्धन, विज्ञान-जनजागृती आणि सर्जनशील उपक्रमांची मेजवानी

। पुरंदर ।
विशेष प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचा पाचवा तसेच सर्वात आधी सुरू होणारा उलूक (घुबड) उत्सव यंदा डिसेंबरपासून जयाद्री खोऱ्यातील पिंगोरी येथे असलेल्या इला फाउंडेशनमध्ये सुरू होत आहे. तीन दिवसीय या विशेष उत्सवात राज्यभरातील विविध शाळांचा सहभाग अपेक्षित असल्याची माहिती जागतिक कीर्तीचे पक्षी तज्ज्ञ डॉ. सतीश पांडे यांनी दिली.**




२०१९ मध्ये इला फाउंडेशनने जयाद्री खोऱ्यात प्रथमच घुबड उत्सवाचे आयोजन केले होते. या पहिल्याच उत्सवाला जगभरातील तब्बल १९ देशांतील घुबड संशोधक व शास्त्रज्ञांनी भेट देत भव्य प्रतिसाद दिला होता. या उपक्रमाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली होती. घुबड हे शेतकऱ्यांचे आणि पर्यावरणाचे विश्वसनीय मित्र असून त्यांच्याबाबत समाजात रूढ असलेल्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी फाउंडेशन सातत्याने कार्य करत असल्याचे पक्षीमित्र राजकुमार पवार (जेजुरी) यांनी सांगितले. डॉ. पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली या जनजागृती मोहिमेला मोठे यश मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

यंदाच्या उत्सवात 'इला हॅबिटॅट', पिंगोरी परिसरात घुबडांच्या जीवनशैलीविषयी शास्त्रीय माहिती, छायाचित्रे, पोस्टर प्रदर्शन, कला-नृत्य-नाटिका, सर्जनशील मॉडेल्स, विविध देशांतील घुबडांवरील पुस्तके, चित्रफिती, लघुपट आदी विविध माध्यमांतून माहिती सादर केली जाणार आहे. तसेच राज्य व देशभरातील निसर्गसंवर्धन संस्था, प्राणी-पक्षी अभ्यासक, पर्यावरण अभ्यासक, महाविद्यालये यांचा वाढता सहभाग नोंदवला जात आहे.

उत्सवाविषयी अधिक माहिती घेण्यासाठी निसर्ग, सण-उत्सव, पर्यावरण व पक्षी-प्राणी विषयांवर लेखन करणाऱ्या सुरुची पांडे, डॉ. ओंकार सुमंत, राहुल लोणकर, फय्याज शेख, प्रल्हाद जाधव, ऋषिकेश जगताप आणि राजकुमार पवार यांच्याशी संपर्क साधला जात असल्याचे आयोजकांनी सांगितले.

> "घुबड हा अंधश्रद्धेचा नव्हे, तर शेतकऱ्यांच्या पिकांचे रक्षण करणारा निसर्गाचा खरा सहकारी आहे. योग्य माहिती लोकांपर्यंत पोहोचली, तर संवर्धन आपोआप घडते."
>
> **– डॉ. सतीश पांडे,** जागतिक कीर्तीचे पक्षी तज्ज्ञ.

---

# जेजुरीच्या खंडोबादेवाची विदेशी पर्यटकांना भुरळ!

## दक्षणा पेटीत आढळल्या अमेरिकन नोटा!; खंडोबा देवस्थानी जागतिक भाविकांची वाढती उपस्थिती

। पुरंदर। प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय लोकदैवत आणि महाराष्ट्रातील कुलदैवत म्हणून खंडोबादेवाचे जेजुरी गडावरचे स्थान अनन्यसाधारण आहे. या गडावरील देवस्थान, भंडारा उधळण्याची अनोखी परंपरा आणि ऐतिहासिक महाखंडा तलवार यांचे आकर्षण केवळ राज्य व देशातील भाविकांपुरते मर्यादित नसून जगभरातील पर्यटकांनाही या लोकदैवताचा मोह पडताना दिसतो.**






अलीकडेच देवस्थानच्या दक्षणा पेट्या मोजणीदरम्यान अमेरिकन डॉलरच्या नोटा आढळल्याने विदेशी भाविकांच्या वाढत्या उपस्थितीची पुष्टीच झाली. देवस्थान व्यवस्थापक आशिष बाठे यांनी यासंदर्भात माहिती देताना, "विविध देशांच्या चलनांच्या नोटा वेळोवेळी दक्षणा स्वरूपात आढळतात. त्या भाविकांच्या श्रद्धेचा पुरावा आहे," असे सांगितले.

अमेरिकेच्या ऑर्लँडो, फ्लोरिडा येथे राहणारे एमआयटी स्लोन स्कूल व्यवस्थापक रमेश बी.के. आणि प्रख्यात व्हॉईस-अभिनेत्री प्रोफेसर सँन्ड्रा क्रासा यांनी नुकतीच जेजुरीला भेट देऊन खंडोबाचे दर्शन घेतले. देवळात ठेवलेल्या ४२ किलो वजनाच्या ऐतिहासिक महाखंडा तलवारीचे त्यांनी प्रत्यक्ष हाताळून दर्शन घेतले. मंदिरातील सुवर्णसदृश पिवळ्या भंडाऱ्याची परंपरा, रिवाज आणि गडाची सांस्कृतिक ओळख पाहून त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. स्थानिक रिवाजनुसार सँन्ड्रा क्रासा यांनी पतीला कडेवर घेऊन भंडाऱ्यात आनंद व्यक्त केला. देवस्थानतर्फे पीआरओ सागर गोडसे, बाळू खोमणे आणि भाटे यांनी या पाहुण्यांचे स्वागत केले.

जेजुरीचे जागतिक स्तरावरील आकर्षण नव्याने नाही. जर्मनीच्या हायडेलबर्ग विद्यापीठातील प्राध्यापक व विख्यात इतिहास संशोधक कै. डॉ. गुंथर सोन्थ्यमर यांनी तब्बल १५ वर्षे जेजुरीत वास्तव करून 'KHANDOBA – THE HUNTING GOD' हा प्रबंध आणि माहितीपट तयार केला होता. रशिया, फ्रान्स, जपान, नेदरलँड्ससह अनेक देशांतील संशोधक, पर्यटक आणि भक्त दरवर्षी जेजुरी दर्शनास येत असतात.

तथापि, जागतिक वारसा लाभलेल्या या गडावरील माहितीपर सुविधा मात्र अत्यंत अपुऱ्या असल्याचेही चित्र समोर येत आहे. महत्त्वाची ऐतिहासिक तलवार अद्याप पत्र्याच्या पेटीतच ठेवलेली असून, देशी-विदेशी पर्यटकांसाठी हिंदी, इंग्रजी व इतर भाषांतील माहितीफलकांचा पूर्ण अभाव आहे. देवस्थान समिती जाहिरातबाजी व राजकीय नातेसंबंध जपण्यात गुंतून मूलभूत सुविधा दुर्लक्षित करत असल्याची स्थानिकांची नाराजी व्यक्त होत आहे. जेजुरी गडाचा जागतिक लौकिक वाढत असताना शासकीय व देवस्थान स्तरावर अधिक सक्षम पायाभूत सुविधा उभारण्याची मागणी मात्र अधिक तीव्र होत आहे.

> "जेजुरी खंडोबा देवस्थान हे फक्त महाराष्ट्र किंवा भारतापुरते मर्यादित नाही. प्रत्येक वर्षी देश-विदेशातून हजारो भक्त येथे येतात. दक्षणा पेटीत वेळोवेळी अमेरिकन डॉलर तसेच युरोप, आशिया आणि इतर भागातून आलेल्या चलनांच्या नोटा आढळतात. हे फक्त आर्थिक मूल्य नाही, तर भाविकांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. आम्ही या सर्व वस्तू आदराने जतन करतो आणि या परंपरेत सातत्य राखण्याचा प्रयत्न करतो. तसेच, विदेशी पर्यटकांनी जेजुरीतील धार्मिक विधी, भंडारा आणि ऐतिहासिक तलवार महाखंडा अनुभवताना अनुभवलेली भावना पाहून आम्हाला खूप आनंद होतो,"
>
> **—आशिष बाठे,** व्यवस्थापक, खंडोबा देवस्थान, जेजुरी.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune